आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२१ मार्च २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जग सध्या युद्धाच्या छायेत असून त्यावर केवळ संवादाच्या मार्गानेच तोडगा निघू शकतो असं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन

- इराणविरोधातली लष्करी कारवाई कमी करण्याचा विचार अमेरिका करत असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे संकेत

- ट्रम्प यांच्या सांगण्यावरुन इराणच्या वायू निर्मिती प्रकल्पांवरचे हल्ले थांबवण्याची इस्त्रायलची तयारी

- देशभरात ईद उल फित्रचा उत्साह

- पश्चिम बंगालमधे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांविषयीच्या सुनावणीसाठी १९ अपीलीय न्यायधिकरणांची स्थापना

**आणि**

- महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांचा राजीनामा

**<><><><><>**

जग सध्या युद्धाच्या छायेत असून त्यावर केवळ संवादाच्या मार्गानेच तोडगा निघू शकतो असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. नागपूर इथं भारतीय युवा संसदेच्या २९व्या राष्ट्रीय अधिवेशनाला ते संबोधित करत होते. भारतीय भाषा आणि विकसित भारत २०४७ ही यंदाच्या युवा संसदेची संकल्पना आहे. मातृभाषेचा वापर प्रादेशिकतेशी नव्हे तर स्वत्वाशी निगडित आहे असं ते म्हणाले. आपल्या मातृभाषेप्रमाणेच इतर भाषांचाही आदर केला पाहिजे असं मत त्यांनी व्यक्त केलं.

- **- - - होल्ड - बाईट - उपराष्ट्रपती - - -**

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आले असून आज मुंबईत ते रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील. त्यानंतर मुंबईत लोक भवन इथे जैन दीक्षा समारंभाच्या कार्यक्रमालाही ते उपस्थित राहतील. उद्या २२ मार्चला पुण्याजवळ उरळीकांचन इथल्या निसर्गोपचार आश्रमाच्या स्थापना दिन कार्यक्रमाला उपराष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

इराणविरोधातली लष्करी कारवाई कमी करण्याचा विचार करत असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलंय. ट्रूथ सोशलवर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलंय की लष्करी कारवाईचं उद्दिष्ट जवळपास पूर्ण होत आलं आहे, त्यामुळे मध्य-पूर्वेतल्या लष्करी कारवाया कमी करण्याचा विचार सुरू आहे. २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या युद्धाला विराम देण्याची त्यांची तयारी असल्याचा संकेत या पोस्टमधून मिळत आहे.
अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांना इराण जोरदार प्रत्युत्तर देत आहे. या आठवड्यात इस्रायलनं इराणमधील गॅस क्षेत्रावर हल्ला केल्यानंतर इराणनं देखील कतारमधल्या जगातल्या सर्वात मोठ्या एलएनजी पुरवठादार प्रकल्पावर हल्ला केला. परिणामी गॅस आणि तेलाच्या किमती झपाट्यानं वाढल्या.

**<><><><>**

तेलाच्या वाढत्या किमतीला आळा घालण्याच्या दृष्टीनं समुद्रावर अडकलेल्या इराणकडच्या इंधन तेलाची खरेदी करण्यावरचे निर्बंध अमेरिकेनं एका महिन्यासाठी शिथिल केले आहेत. समुद्रात अडकलेल्या इराणच्या तेलाच्या खरेदीवरचे निर्बंध विशेष परवान्याअंतर्गत शिथिल केले असून ही तात्पुरती सवलत, कालपर्यंत जहाजांवर चढवण्यात आलेल्या इराणच्या तेलाला लागू असेल, असं ट्रंप प्रशासनानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विनंतीवरून इस्रायल इराणच्या वायू निर्मिती प्रकल्पांवरचे हल्ले थांबवेल असं इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामीन नेत्यान्याहू यांनी म्हटलं आहे. तसंच अमेरिकेने इराणच्या तेलविक्रीवरील निर्बंध तीस दिवसांसाठी शिथील करण्याचा निर्णय घेतला आहे. जागतिक बाजाराच्या स्थैर्यासाठी हा निर्णय घेतल्याचं अमेरिकेचे ट्रेजरी सेक्रेटरी स्कॉट बेसेन्ट यांनी सांगितलं.

<><><><><>

इराकची राजधानी बगदाद इथं गेल्या काही दिवसांत ड्रोन आणि रॉकेट हल्ल्यांत मोठी वाढ झाली आहे. आज झालेल्या ताज्या हल्ल्यात बगदाद आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळच्या कॅम्प व्हिक्ट्रीला लक्ष्य करण्यात आलं.

वेगवेगळ्या वृत्तांनुसार, या हल्ल्यानंतर मोठी आग लागून आकाशात दाट धुराचे लोट पसरले. इराणच्या पाठिंब्यानं कार्यरत असणाऱ्या काही सशस्त्र गटांनी या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. इस्लामिक रेझिस्टन्स इन इराक या नावाखाली काम करणाऱ्या गटाचाही यात समावेश आहे. हा भाग अमेरिकेचा लष्करी तळ आणि पुरवठा केंद्र असल्याचं या गटांनी म्हटलं आहे.

बगदाद विमानतळाजवळ झालेल्या एका हल्ल्यात सुरक्षा दलातले काही जवान जखमी झाल्याची माहिती इराकच्या सूत्रांनी दिली आहे. इराणच्या पाठिंब्याने काम करणारे अशब अल-कहफ आणि कताइब हिझबोल्ला यासारख्या गट एकत्रितपणे हे हल्ले करत असल्याचे मानले जात आहे.

<><><><><>

एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसची ४२ विमानांची सेवा आज पश्चिम आशियाई क्षेत्रात सुरू राहणार आहे. याशिवाय जेद्दाह आणि मस्कटसाठीही एअर इंडियाची विमानसेवा सुरू राहील. या क्षेत्रातील काही मार्गांवर अद्याप विमानसेवा निलंबित आहेत.

दरम्यान, पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, आखातातली काही हवाई क्षेत्रं टाळण्याचा सल्ला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं विमान कंपन्यांना दिला आहे.

<><><><><>

ईद उल फित्र सण आज देशभरात साजरा केला  जात आहे.

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी देशवासियांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण आत्मसंयम, वंचितांबद्दल करुणा बाळगण्याची तसंच दानधर्म करण्याची शिकवण देतो असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आपल्या संदेशात म्हणाल्या. प्रेम, बंधुत्व, शांतता आणि सौहार्दाचा संदेश देणारा हा सण असून प्रत्येकाच्या कल्याणासाठी आपण प्रयत्न  करायला हवेत याची आठवण ईद करून देतो  असं राष्ट्रपती म्हणाल्या.

सर्वांच्या हृदयात आशा, सौहार्द आणि करूणा रुजावी अशी प्रार्थना उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी ईदच्या निमित्ताने केली.

तर या मंगलप्रसंगी सर्वांना आनंद, सुख, उत्तम आरोग्य आणि समृद्धी लाभो अशी कामना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पारसी बांधवांना नववर्ष नवरोजच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे नवं वर्ष सर्वांना समृद्धी आणि आनंदाचं जावो असं त्यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलंय. तसंच त्यांनी सर्वांचं उत्तम आरोग्य आणि आकांक्षापूर्तीसाठीही प्रार्थना केली.

<><><><><>

विधानसभा निवडणूक पारदर्शकपणे आणि निष्पक्ष व्हावी यासाठी निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमधे १९ अपीलीय न्यायाधीकरणांची स्थापना करण्याची अधिसूचना जारी केली आहे. मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाच्या दरम्यान मतदार यादीत नाव समाविष्ट करणं किंवा वगळणं या प्रकरणी हे न्यायधिकरण सुनावणी करेल. सर्वोच्च न्यायालयाच्या १० मार्च २०२६ च्या आदेशानुसार आणि कोलकता उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार हा निर्णय घेतल्याचं निवडणूक आयोगाने सांगितलं. यातल्या १८ न्यायधिकरणांच्या अध्यक्षपदी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश असतील तसंच एका न्यायधिकरणाच्या अध्यक्षपदी कोलकता उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश असतील.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधल्या राजकीय जाहिरातींचं नियमन करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. जाहिरात छापण्याआधी ती माध्यम प्रमाणीकरण आणि देखरेख समितीकडून तपासून घेणं राजकीय पक्ष, उमेदवार, संस्था यांना बंधनकारक करण्यात आलं आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने ईव्हीएम - व्हीव्हीपॅटची पहिली चाचणी पूर्ण केली. राष्ट्रीय आणि मान्यताप्राप्त पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी ही चाचणी केली. ही यंत्रं प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्राँग रुममधे ठेवली जातील असं आयोगाने सांगितलं.

<><><><><>

काँग्रेसने आसाम विधानसभा निवडणुकीसाठी सात उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. बिदीशा नेओग जलुकबरी मतदारसंघातून निवडणूक लढवतील, जयंता बोराह हे बिस्वनाथ मतदारसंघातून तसंच राऊल रॉय हैलकांडी मतदारसंघातून निवडणूक लढवतील.

<><><><><>

आज आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी देशवासियांना वनांचं रक्षण करण्याची शपथ घेण्याचं आवाहन केलं. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनं २०१२ मध्ये २१ मार्च हा आंतरराष्ट्रीय वन दिन म्हणून घोषित केला. या दिवशी वनांच्या महत्त्वाविषयी जागरुकता निर्माण केली जाते. वृक्षारोपण मोहिमांसारख्या कार्यक्रमांचं आयोजन करण्यासाठी प्रोत्साहित केलं जातं. वने आणि अर्थव्यवस्था अशी यंदाच्या वन दिनाची संकल्पना आहे.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी काल आपल्या पदाचा राजीनामा दिला. कथित बलात्कार प्रकरणातील आरोपी अशोक खरात याच्याशी संबंध असल्याच्या आरोपावरून चाकणकर यांच्यावर टीका होत होती. वैयक्तिक कारणावरून आपण राजीनामा देत असल्याचं चाकणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात म्हटलं आहे. चाकणकर या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडी प्रमुख असून त्यांनी या पदावरूनही पायउतार होत असल्याचं पत्र पक्षाच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांना दिलं आहे. अशोक खरात प्रकरणाची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून दोषींवर कडक कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

<><><><><>

फ्रान्समध्ये सुरू असलेल्या ऑर्लेन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीत भारताच्या तन्वी शर्मा हिचा उपांत्य फेरीचा सामना आज जपानच्या गतविजेत्या नोझोमी ओकूहारा हिच्याबरोबर होणार आहे.

//<><><><><>//